# सातारा जिल्हा परिषद सातारा महिला व बाल विकास विभाग
## दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३३७५२.

जा.क्रं.मबाक/कावि-१/४४५/२०१८
सातारा दिनांक :- २६/९/२०१८

प्रति,

१. ४.

२. ५.

३.

**विषय-** महिला व बाल विकास समिती सदस्यांचा अभ्यासदौरा आयोजित करणे बाबत

महिला व बाल विकास सदस्यांचा राज्याबाहेरील अभ्यास दौरा हरीयाणा,हिमाचल प्रदेश येथे आयोजित करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.आपण आपले दरपत्रके या कार्यालयाकडे दि.४/१०/२०१८ रोजी दुपारी ४.०० पर्यत समक्ष लिफाफाबंद सादर करावेत.

महिला व बाल विकास समिती सदस्यांचा अभ्यासदौरा हरियाणा,हिमाचल प्रदेश येथे आयोजित करणेसाठी रेल्वे प्रवास वातानुकुलीत थ्री टायर्स बुकींग, रेल्वे स्थानकापासून ते हरीयाणा,हिमाचल प्रदेश राज्यातील सर्व भेटी देण्याची ठिकाणां पर्यंत २ × २ ची एसी लक्झरी बस सेवा, प्रवासा दरम्यान नाष्टा, सकाळचे जेवण, संध्याकाळचे जेवण व दुपारी चहा/नाष्टा, स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविणे, सर्व प्रवेश कर,टोल,व्हॅट, इत्यादीसह दर नमुद करावेत. मराठी,हिंदी,इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारा गाईड असणे आवश्यक आहे. दोन प्रवाशांना एक डिलक्स/A/C रुम देणे बंधनकारक आहे.तेथे स्वच्छता व लोकेशन चांगले असावे. सर्व कर,जेवण,फिरणे,नाष्टा,वाहतुक,रहाणे यासह दर एकत्रित एका व्यक्तीचे प्रवासासाठी नमुद करावेत.त्यामध्ये अतिरिक्त करांचा /सेवांचा समावेश नसावा. कोणत्याही प्रवाशाला संपूर्ण प्रवासात कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही. तसेच वाहानांच्या सुविधा मध्ये वाहनांचे टुरीस्ट चे परवाना असणे आवश्यक आहे. या सर्व बाबींसहीत मान्यता प्राप्त पर्यटन कंपनींचे दरपत्रके मागविणेत येत आहेत. सविस्तर तपशिल सोबत सादर केला आहे.

**दरपत्रकासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.**

**१. पहिला लखोटा**

१.स्वतः कंपनीचे अधिकृत प्रायोजक/त्यांचे ट्रॅव्हल एजंट की जे व्यवसाय करणेस मान्यता असलेबाबतचे (कंपनीचे) प्रमाणपत्र अथवा सक्षम अधिकृत मान्यता प्राप्त संस्थेचे वैध प्रमाण पत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे त्याची फोटोप्रत सादर करावी.

२. पॅन कार्ड ची प्रत.

३. जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रत,

४.आर्थीक वर्ष सन २०१७-१८ चा अद्यावत आयकर दाखला.

**२. दुसरा लखोटा**

१. यामध्ये सर्व करासहीत प्रति व्यक्ती खर्चाचा दर नमुद करावा.

दरपत्रके शक्य झालेस दिनांक ५.१०.२०१८ रोजी अथवा तदनंतर महिला व बाल विकास विभाग चौथा मजला जिल्हा परिषद सातारा येथे उघडणेत येतील.

महिला व बाल विकास अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रत :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)जिल्हा परिषद,सातारा
२/- जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी

# सातारा जिल्हा परिषद,सातारा.

## महिला व बाल बिकास विभाग, दरपत्रकाद्वारे सेवा पुरविणे वर्णन दर्शविणारा तपशील.

| अ.क्रं | योजनेचे नांव. | अंदाजे तरतुद रु लाखात | अंदाजे प्रवासातील व्यक्ती संख्या | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | महिला व बाल विकास समिती सदस्यांचा अभ्यास दौरा (हरीयाणा, हिमाचल प्रदेश राज्यातंर्गत) | ३.०० | कमीत कमी ९ व जास्तीत जास्त १२ व्यक्ती | १) रेल्वे प्रवास वातानुकुलित थ्री-टायर्स<br>२) रेल्वे स्थानकापासून (हरीयाणा,हिमाचल प्रदेश राज्यातील पंचायत राज संस्थांना भेटी देणेसाठी व तेथील नाविण्यपुर्ण योजना,महिला सक्षमीकरण यांचे अभ्यासास्तव आहे.) २X२ A/C लक्झरी बस सेवा देणे बंधनकारक<br>प्रवासाचा तपशील खालीलप्रमाणे<br>१.हरीयाणा, हिमाचल प्रदेश राज्यात खालील ठिकाणांना भेटी देवून तेथील कार्यपध्दती व नाविन्यपूर्ण योजनांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौरा प्रस्तावीत आहे..<br>अ) चंदीगढ :- समाजकल्याण व महिला व बाल कल्याण विभागांना भेट देणे.<br>ब) हरीयाणा :- महिला व बाल कल्याण कार्यालयास भेट देणे.<br>क) सिमला :- जिल्हा परिषद,पंचायत समिती व माशब्रो ग्रामपंचायत कार्यालयांना भेट देणे.<br>ड) धरमशाला :- जिल्हा पंचायत कार्यालयास भेट देणे.<br>ई) डलहौसी :- ग्रामपंचायत कार्यालयास भेट देणे.<br>२.हरीयाणा, हिमाचल प्रदेश मधील एकात्मिक बाल विकास योजना कडील अंगणवाडी प्रकल्प यांना भेटी.<br>३.परतीचा प्रवास<br>३) दुपारचा चहा /नाष्टा यासह दर नमुद करावेत.<br>४) स्वच्छ पिणेचे पाणी प्रवासात पुरविणे.<br>५) सर्व प्रवेश कर,टोल,व्हॅट इत्यादी सह दर नमुद करावेत.<br>६) मराठी,इंग्रजी,हिंदी तिन्ही विषयांचे सखोल ज्ञान व बोलता येणारा गाईड(मार्गदर्शक) प्रवासात सोबत असावा.<br>७) प्रवासा दरम्यान महाराष्ट्रीयन तसेच आवश्यकतेप्रमाणे सदर राज्याचा फुडचा समावेश असावा.<br>८) कोणत्याही प्रवाशाला संपुर्ण प्रवासात कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही.याची दक्षता घेणेत यावी.<br>९) दोन प्रवाशांना एक डिलक्स / A/C रुम देणे बंधनकारक आहे.तेथे स्वच्छता व लोकेशन चांगले असावे.<br>१०) प्रवासाचे दिवस कमीतकमी ०७ व जास्तीत १० दिवस असावेत<br>११) सर्व कर,जेवण,फिरणे,नाष्टा,वाहतुक,यासह दर एकत्रित एका व्यक्तीचे प्रवासासाठी नमुद करावेत.त्यामध्ये अतिरिक्त करांचा /सेवांचा समावेश नसावा.<br>१२) सदर अभ्यास दौ-यामध्ये कमीतकमी ९ व जास्तीत जास्त १२ सदस्य समाविष्ट असतील त्यामध्ये कमी जास्त होऊ शकेल.<br>१३) सदरचा अभ्यासदौरा नोव्हेंबर २०१८ मध्ये आयोजित करणेचा आहे.<br>१४) अभ्यासदौरा पूर्ण झाल्यावर आवश्यक कागदपत्रे सादर केले नंतर देयक अदा करणेत येईल व नियमानुसार देयकातून कर कपात करणेत येईल. |

महिला व बाल विकास अधिकारी<br>
सातारा जिल्हा परिषद,सातारा